# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 24/01/2024 (बुधवार) सायंकाळ

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
## पोलीस स्टेशन देवलापार नागपूर ग्रामीणची कारवाई

दिनांक २४/०१/२०२४ चे ००.१५ वा. ते ०१.१० वा. चे दरम्यान पोस्टे देवलापार येथील पोलीस पथक पोलीस ठाणे परिसरात पेट्रोलींग करीत असताना मानेगाव टेक रामटेक येथे मुखबीरद्वारे खात्रीशीर माहिती मिळाली की, ट्रक क्रमांक एम.एच–४०/वाय–८२७४ मध्ये जबलपूर ते नागपूर रोडने कत्तलीकरीता जनावरांची वाहतुक होत आहे, अशी मिळालेल्या खबरेवरून मानेगाव टेक चेक पोस्ट जवळ नाकाबंदी केली असता ट्रक क्रमांक एम. एच–४०/वाय–८२७४ येतांना दिसले. सदर वाहनाला थांबविले असता सदर वाहनाची तपासणी केली असता वाहनामध्ये २४ गोवंश जनावरे यांना अतिश आखुड दोराने बांधुन अतिश दाटीवाटीत कोंबुन बांधुन त्यांना कोणतीही बसण्याची व चारापाण्याची व्यवस्था न करता कत्तलीकरीता २४ जिवंत पांढरे व काळे रंगाचे गोवंश बैल प्रत्येकी १५,०००/–रू. प्रमाणे एकुण ३,६०,०००/–रू. चे गोवंश जनावरे व ट्रक क्र. एम.एच–४०/वाय–८२७४ किंमती १५,००,०००/–रू. असा एकुण १८,६०,०००/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी क्र. ०१) नामे– नवसाद इब्राहीम सय्यद, रा. वार्ड नं. ०३, नवाब मोहल्ला लाखनी, २) बशिर अब्दुल अजिज कुरेशी, रा. पिली नदी शिवाजी चौक, यशोधरा नगर नागपूर ३) मोहम्मद सयजाद मोहम्मद इजाज रा. कमर कॉलनी पोस्टे कपिल नगर जवळ, कामगार नगर नागपूर हे आरोपी क्र. ४) कादर शेख खवासा कुरई सिवनी मध्यप्रदेश याचे सांगणेवरून सदर जनावरे घेवुन जातांना मिळाले. सदरचे गोवंश बैल हे गो विज्ञान अनुसंधान केंद्र देवलापार, ता. रामटेक येथे जमा करण्यात आले. आरोपींविरूद्ध कलम २७९, १०९, ३४ भांदवि, सहकलम ११ (१), (ड) प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम १९६०, सहकलम ५ (अ), ९ प्राणी संरक्षण अधिनियम, ११९ महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १८४ मोवाका. प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपी क्र. ०१ ते ०३ यांना अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक सा. नागपूर (ग्रामीण) श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से.) तसेच अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले साहेब यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे देवलापार येथील ठाणेदार सपोनि राजेश पाटील, पोशि केशव फड, क्रांतीचंद हरार, मनिष चोकसे चालक पोहवा गजानन कविराजवार यांनी केली.



## पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत COTPA कारवाई

पोलीस स्टेशन सावनेर हद्दीतील पाटणसावंगी येथील इंम्पेरियल गार्डन येथे काही लोक अवैध्यरित्या हुक्का पित आहे. अशी गुप्त बातमीदारांकडुन माहीती मिळाल्यावरून API नागवे, भस्मे, मोकाशे व स्टॉफसह इंम्पेरियल गार्डन पाटणसावंगी येथे रेड केली असता आरोपी नामे– १) वैभव विकास कांबळे वय २६ वर्ष रा. प्लॉट नं. २ बाबा बुध्दनगर पाचपावली नागपुर २) अभिनंदन अजय जैन, वय ३० वर्ष रा. प्लॉट नं. ५०१ वर्धमान नगर नागपुर ३) अमित अनिल चांडक वय २८ वर्ष रा. प्लॉट नं. २९ अध्यापक लेख आऊट राणाप्रताप नगर नागपुर ४) यश राजु अग्रवाल वय २९ वर्ष रा. धंतोली नागपुर हे अवैध्यरित्या हुक्का पितांना मिळुन आले. घटनास्थळावरून हुक्का पिण्याचे साहीत्य जप्त करण्यात आले आहे तसेच यातील इंम्पेरियल गार्डन मालक नामे– विवेक राय रा. पाटणसावंगी याने हुक्का उपलब्ध करुन दिल्याने आरोपी व मालक यांचे विरुध्द पो.स्टे. सावनेर येथे अप. क्रमांक ५२/२४ कलम १८८ भा.द.वि. सहकलम ४,२० COTPA ॲक्ट २००३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदिप पखाले, उपविभागीय पोलीस अधिकारी तथा सहायक पोलीस अधिक्षक अनिल म्हस्के, पोलीस निरीक्षक रविंद्र मानकर, सहायक पोलीस निरीक्षक भस्मे, नागवे, मोकाशी, पोलीस हवालदार कोकाटे, राजू चटप, नंदू मेश्राम, नापोशि रंजन कांबळे, सतिश देवकते यांनी केली आहे.



## दागिने चोरी

**पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील भाग्यश्री कॉलनी शितलवाडी मौदा रोड येथे दिनांक २०/०१/२०२४ चे ००.३० वा. ते ०६.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे—धनंजय वसंतराव तरारे वय ४८ वर्ष रा. भाग्यश्री कॉलनी शितलवाडी मौदा रोड ता. रामटेक जि. नागपुर याचे घराच्या अंगणात दुर्गा देवीचे मंदीर असुन फिर्यादीची पत्नी सौ. शोभना तरारे ही अंगणात साफसफाई करीत असता तिने मंदीराकडे पाहीले असता दुर्गा देवीचे मुर्तीला असलेले सोन्याचे दागीने दिसले नाही म्हणुन ती पत्नी फिर्यादीस उठवुन सांगु लागली की, मंदीरातील सोन्याचे दागीने चोरी गेलेले आहेत असे फिर्यादीस सांगीतल्याने फिर्यादीने मंदीरात जावुन दुर्गा देवीची मुर्तीची पाहणी केली असता दुर्गा देवीचे मुर्तीला असलेले सोन्याचे दागीने दिसले नाही कोणीतरी अज्ञात चोरानी सोन्याचे कानातील कर्णफुल ६ ग्रॅम गळयातील सोन्याची मणचली ६ ग्रॅम नाकातील सोन्याची नथनी ३ ग्रॅम व सोन्याचे मंगळसुत्र १५ ग्रॅम असा एकुण ६५,०००/— रूपयाचा मुद्देमाल चोरून नेलेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास संजय पायक मो. नं. ८८३०९२३३१० हे करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. भिवापूर** :— अंतर्गत ०४ कि. मी. अंतरावरील मेखाडा शिवार भिवापूर येथे दिनांक २२/०१/२०२४ चे १०.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— विकास पांडूरंग मदने, वय ३७ वर्ष रा. भिवापूर ता. भिवापुर जि नागपूर ०९२८ हे १०/३० वा. दरम्यान कृषी चिकीत्सक तालूका बीजगून प्रक्षेत्र मोखाडा येथे गेले असता साहीत्य गोदामाचे उघडे परीसरात ठेवलेले असता साहीत्य चोरीला गेल्याचे आढळून आले १) बैलबंडीची लोखंडी चाके आरेसह जूने २ नग किंमती ५०००/— रू. २) एक जूना नग नांगर किंमती १०००/—रू. ३) कॅश बॉक्स १ जूना नग किंमती ५००/—रू. ४) ऑयल इंजीन जूने एक नग किंमती ५०००/— रू. ५) वजन मापे ५० किलो, २० किलो, १० किलो, ५ किलो ५०० ग्रॅम, २०० ग्रॉम, १००ग्रॉम किंमती २०००/—रू. ६. इलेक्ट्रीक मोटरपंप १० एच. पी एक नग ५०००/—रू. ७) इलेक्ट्रीक मोटरपंप ०५ एच. पी एक नग ३०००/—रू. ८) निम पल्व्रयझेर ची मोटार ०५ एच.पी एक नग ३०००/—रू. ९) तूशार नोझल रायझरसह १४ नग किंमती ४०००/— रू. १०) लोखंडी तिफन १ नग किंमती १०००/— रू. ११) टिन पत्रे ३० नग किंमती ५०००/— रू. १२) ट्रॅक्टर साहीत्य बॅटरी, स्टॉबीलायझर आर्म, लिफट आर्म किंमती १५०००/— रू. एकूणे ४९५००/— रू. चा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापूर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक रविंद्र जाधव पोस्टे भिवापूर मो. नं. ८६०५८९४४२२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**